# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **27/12/2022**

**Brief of the work done :-**

पो.स्टे. मालेगाव पोलीसांनी केले मुलीची छेड काढणाऱ्यास अटक ; महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी वाशिम पोलीस दल सदैव तत्पर आहे.

## मालेगांव पोलिसांनी केली रोड रोमियोच्या जाचातून मुक्तता

### यापुढेही चिडिमारांवर कार्यवाही करण्याबाबत ठाणेदार किरण वानखेडेंचे संकेत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ■ मालेगांव शहरातील नागरिकांनी ठाणेदार किरण वानखेडे यांची भेट घेऊन शहरातील एका रोड रोमियोच्या त्रासाबद्दल व त्यांच्याकडून खोट्या केसेस करण्याच्या धमक्या बाबत माहिती दिली होती. ठाणेदारांनी याबाबत शहानिशा करून खात्री झाल्यावर सदर रोड रोमियोवर त्यांच्या विशिष्ट शैलीत कार्यवाही करून नागरिकांची त्याच्या त्रासापासून मुक्तता केली आहे. सदर कार्यवाही मूळे शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

याबाबतीत मिळालेल्या माहितीनुसार शहरातील काही नागरिकांनी ठाणेदार किरण वानखेडे यांची भेट घेऊन त्यांचे समोर एका रोड रोमियोचे कारनामे विशद केले होते. याबाबतीत आपल्या सहकाऱ्यांना शहानिशा करण्याचे निर्देश ठाणेदारांनी दिले होते. पोलिसांनी परिसरातील नागरिक काही दवाखाने व दुकानात काम करणाऱ्या मुलींना भेटून त्यांना सदर रोडरोमियो पासुन होणाऱ्या त्रासाची इत्यंभूत माहिती मिळवली. पोलिस यंत्रणा सदर रोड रोमियोवर पाळत ठेवून होती. नागरिकांनी सांगितल्या प्रमाणे सदर रोडरोमियोपासुन काही मुलींना होणारा त्रास यामुळे उघडकीस येताच काल २४ डिसेंबर रोजी ठाणेदार किरण वानखेडे, सहायक पोलिस निरीक्षक तानाजी गव्हाणे, सहायक पोलिस उपनिरीक्षक रवि सैबेवार पोलिस हेड कॉन्स्टेबल कैलास कोकाटे, गजानन झगरे, प्रशांत वाढणकर पोलिस कॉन्स्टेबल अमोल पाटील, नायब पोलिस कांस्टेबल सुधिर सोळंके आदींनी सदर रोडरोमियोला पोलिसी खाक्या दाखविला.

सदर रोडरोमियोवर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येवून पोलिस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा वाशिम यांचे कडे प्रकरण पाठविण्यात आले आहे. मालेगांव पोलिसांनी केलेल्या या कार्यवाहीमूळे शहरातील रोड रोमियोंचे धाबे दणाणले असून शहरातील नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.

यापुढेही चिडिमारांवर अशीच कार्यवाही करण्याचे संकेत ठाणेदार किरण वानखेडे यांनी दिले असून, त्याकरिता अशा रोड रोमियों च्या त्रासाबद्दल माहिती पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.(श.प्र.)